दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २६७ | MAHMAR/2006/17212 | रायगड | गुरुवार, दि.२५ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## रोह्यातील शेतकरी विम्याच्या पैशांपासून वंचित

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहा तालुक्यातील काही विभागात फळ बागायतदार शेतकरी वर्गाला विम्याचे पैसे अद्याप मिळाले नाहीत. विम्याच्या पैशांसाठी शेतकरी वर्गाची प्रतिक्षा काही संपत नसून बागायतदार शेतकरी वर्गाचा पुरता भ्रमनिरास झाला आहे. गत दोन वर्षांपूर्वी कोसळलेला अवकाळी पाऊस व बदललेले हवामान यामुळे बागायतदार शेतकरी वर्गाचे खुप मोठे नुकसान झाले आहे.नुकसान झालेल्या बागायती शेतीचे शासकीय पंचनामे झाल्यानंतर नुकसान भरपाई विम्याचे पैसे लवकरच मिळतील अशी आशा होती.परंतू वर्ष उलटून गेले तरी अद्याप नुकसान भरपाई विम्याचे पैसे मिळाले नसल्याने शेतकरी वर्ग पुरता निराश झाला आहे.तालुक्यातील निडी तर्फे अष्टमी व आंबेवाडी -कोलाड हे दोन मंडळ वगळता बाकी जवळपास सर्वच मंडळातील शेतकरी वर्गाला विम्याचे पैसे मिळाले असल्याने निडी तर्फे अष्टमी व आंबेवाडी -कोलाड या दोन मंडळातीलच शेतकरी वर्गावर अन्याय का असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला आहे शेतकरी वर्गाला भरपाई मिळत नसल्याने त्यांची चिंता वाढू लागली आहे.त्यामुळे आधीच विविध मार्गाने संकटात सापडलेले शेतकरी यामुळे अधिकच खचले आहेत.

### ठाकरे बंधूंकडून युतीची घोषणा....

# मुंबईचा महापौर मराठीच होईल आणि तो आमचाच होईल : राज ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

विधानसभा निवडणुकीवेळी भाजपने 'बटेंगे तो कटेंगे'चा अपप्रचार केला होता. यामुळेच मराठी माणसांना आवाहन करतोय आता जर का चुकाल तर संपाल हे लक्षात ठेवा. आता जर का फुटाल तर पूर्णपणे संपून जाल. म्हणूनच 'तुटू नका, फुटू नका आणि मराठीचा वसा टाकू नका', असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठी जनांना केले. मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना- मनसे युतीची घोषणा करतानाच मुंबईचा महापौर मराठीच होईल आणि तो आमचाच होईल, असा निर्धार मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केला.

'एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी' ही घोषणा उद्धव ठाकरे यांनी ५ जुलैच्या वरळीतील सभेत केली होती. यानुसार ठाकरे बंधू एकत्र आले व त्यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी युतीची घोषणा केली. 'कोणताही वाद आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे', असे मी एका मुलाखतीत म्हणालो होतो याची आठवण राज ठाकरे यांनी करून दिली.

अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या युतीची घोषणा वरळी येथील पत्रकार परिषदेत केली. इतकी वर्षे व्यवस्थित गेली आणि आज परत आपण पाहत आहोत की, मुंबईचे लचके, मुंबईच्या चिंधड्या




उडवायच्या हे मनसुबे त्यावेळेला ज्यांना मुंबई पाहिजे होती, त्यांच्याकडून रचले जात आहेत. त्यांचेच दोन प्रतिनिधी वर दिल्लीत बसलेले आहेत आहेत.आता जर का आपण भांडत राहिलो तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी जो संघर्ष मराठी माणसांनी हुतात्म्यांनी केला. त्या हुतात्मा स्मारकाचा अपमान होईल. त्यासाठी कर्तव्य म्हणून एकत्र आलो आहोत, ते एकत्र राहण्यासाठी, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी हा युतीचा धागा अधिक घट्ट केला.

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्याकडून मुंबई आणि मराठीच्या मुद्द्यावर भर देण्यात आला. उद्धव ठाकरे यांनी मराठी माणसाच्या बलिदानामुळे मुंबई महाराष्ट्राला मिळाली हे सांगताना संयुक्त महाराष्ट्र लढ्यात प्रबोधनकार ठाकरे, बाळासाहेब ठाकरे, राज ठाकरे यांचे वडील श्रीकांत ठाकरे यांच्या या लढ्यातील योगदानाची आठवण करून दिली.

राज ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत अधिक बोलणे टाळले. मला जे बोलायचे आहे ते जाहीर सभांमधून बोलेन हे सांगताना त्यांनी युतीची चर्चा ज्या मुलाखतीपासून सुरू झाली, त्याची आठवण करून दिली. एका मुलाखतीदरम्यान कोणत्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे हे म्हणालो होतो. तिथून आम्ही एकत्र येण्याची सुरुवात झाली. कोण किती जागा लढवणार? आकडा काय? हे आम्ही तुम्हाला सांगणार नाही. महाराष्ट्रात सध्या लहान मुले पळवणाऱ्या टोळ्या फिरतायत, त्यात दोन व्यक्ती समाविष्ट झाल्या आहेत. ते राजकीय पक्षांमधली मुले पळवतात, असे सांगताना त्यांनी भाजप आणि शिवसेना शिंदे गटावर टीका केली.

मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, मीरा भाईंदर यासह अन्य महापालिकांत युती होणार असल्याचे सांगण्यात येत असले तरी आजच्या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी मुंबई आणि नाशिकची युती ठरली असून अन्य महापालिकांबाबत नंतर घोषणा करण्यात येईल असे जाहीर केले. . तूर्त मुंबई महापालिकेची युती जाहीर केली आहे. जशा अन्य महापालिकांचे ठरेल तशी माहिती देऊन, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

> महाराष्ट्राने मुंबई मिळवल्यावर मुंबईतच मराठी माणसाच्या उरावर उपरे नाचायला लागले आणि न्याय्य हक्कांसाठी बाळासाहेब ठाकरेंना शिवसेनेची स्थापना करावी लागली. मधली वर्षे व्यवस्थित गेली. पण आज पुन्हा एकदा मुंबईचे लचके तोडायचे मनसुबे दिल्लीतून रचले जात आहेत. यापुढे मुंबईवर आणि महाराष्ट्रावर कुणीही वाकड्या नजरेने किंवा कपटी कारस्थानांनी मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न करेल, त्याचा राजकारणात खात्मा केल्याशिवाय राहणार नाही ही शपथ घेऊन आम्ही मैदानात उतरलो आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.

> जे निवडणुका लढवणार आहेत, त्या सर्व उमेदवारांना दोन्ही पक्षांकडून उमेदवारी दिली जाईल. अर्ज कधी भरायचे वगैरे माहिती नंतर दिली जाईल. बरेच दिवस ज्याची प्रतीक्षा महाराष्ट्र करत होता, ती शिवसेना (ठाकरे) व मनसेची युती झाली हे आम्ही जाहीर करत आहोत, अशी घोषणा राज ठाकरे यांनी केली. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच होणार, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## निवडणूक काळात आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणीसाठी विविध पथकांना प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आज विविध पथकांना त्यांच्या जबाबदाऱ्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये व्हिडिओ व्ह्यूइंग पथक (VVT), स्टॅटिक सर्व्हेलन्स पथक (SST), व्हिडिओ सर्व्हेलन्स पथक (VST) तसेच भरारी पथक (Flying Squad) यांना प्रशिक्षण आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अतिरीक्त आयुक्त महेश मेघमाळे व उपायुक्त रवीकिरण घोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले. तसेच इव्हीएम हाताळणी प्रशिक्षण महापालिकेच्या व्यापारी संकुल येथे परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे व उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले.

यामध्ये भरारी पथक (Flying Squad) हे तक्रारींवर तात्काळ कारवाई करणे, आचारसंहिता उल्लंघनाची तपासणी करणे तसेच



पोलीस व निवडणूक निर्णय अधिकारी (RO) यांच्या कार्यालयाशी समन्वय साधण्याची महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. रोख रक्कम, दारू, भेटवस्तू आदींची तपासणी व जप्ती, तसेच व्हिडिओ/फोटोद्वारे पुरावे गोळा करणे या प्रमुख कामाबाबत या प्रशिक्षणात माहिती देण्यात आली. व्हिडिओ व्ह्यूइंग पथकाने सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक प्रचारावर लक्ष ठेवून उल्लंघनाचे व्हिडिओ पुरावे संकलित करणार असून वेळोवेळी निवडणूक निर्णय अधिकारी (RO) कडे अहवाल सादर करण्याबाबत सूचना यावेळी देण्यात आल्या. याबरोबरच चित्रीकरण केलेल्या व्हिडीओचे परीक्षण , उल्लंघन ओळखून अहवाल करणे व खर्च नोंदणीसाठी आवश्यक माहिती देण्याचे कामही या पथकाकडून करण्यात येणार आहे.

स्टॅटिक सर्व्हेलन्स पथकाने तपास नाके व संवेदनशील ठिकाणी वाहन तपासणी करून रोख रक्कम व मौल्यवान वस्तूंची तपासणी करणार आहे. पंचनामे, अहवाल तयार करणे व व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे ही जबाबदारी या पथकावर असेल. व्हिडिओ सर्व्हेलन्स पथकाने सभा, मिरवणुका व प्रचार कार्यक्रमांचे चित्रीकरण करून खर्च निरीक्षणासाठी आवश्यक पुरावे उपलब्ध करून देणार आहे. आचारसंहिता उल्लंघनाची नोंद घेणे हेही या पथकाचे प्रमुख कार्य आहे. याबाबत या प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.

क्षेत्रीय अधिकारी , मास्टर ट्रेनर, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालातील कर्मचारी, ईव्हीएम हाताळणी करणारे कर्मचारी यांना इव्हीएम हाताळणी प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये इव्हिएम मशीन मधीन कंट्रोल यूनिट, कॅनसेट, इव्हिएम संचाची चेकिंग, रिअल टाईम क्लॉक सेटिंग याबाबती माहिती देण्यात आली.

## पिंगळसईचे जंगल वणव्याने होरपळले

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहा तालुक्यातील पिंगळसई येथे मागील दोन तीन दिवसांपूर्वी जंगल भागात लागलेल्या वणव्याने पिंगळसईचे जंगल अक्षरक्ष: होरपळून निघून जंगल संपत्तीची प्रचंड हानी झाली आहे. रोहा सामाजिक वनीकरण विभागामार्फत शून्य वणवा ही संकल्पना राबविली जात असतानाच वणवा लावून जंगल संपत्तीची हानी करणारे एकार्थी वन विभागाला आव्हानच देत आहेत.तर दरवर्षी तालुक्यातील जंगल भागात लावल्या जाणाऱ्या वणव्यांमुळे जंगलसंपत्तीची विपरित होत असून पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून याबाबत स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली जात आहे.विविध कारणांसाठी लावल्या जात असलेल्या वणव्यांमुळे जंगलसंपत्तीची तर हानी होतेच. तर याशिवाय जंगलभागात वास्तव्यास असणाऱ्या अन्य सजीव प्राणी यांचाही निवारा नष्ट होऊ लागला आहे.पिंगळसई येथे लावण्यात आलेल्या वणव्याने जंगल संपत्तीची प्रचंड प्रमाणात हानी झाली असल्याने याबाबत पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून प्रचंड चिड व्यक्त केली जात आहे.



### आ.प्रशांत ठाकूर यांच्या मागणी व पाठपुराव्याला यश

## सिडको-नैना अधिसूचित क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तात्काळ कार्यवाहीचे निर्देश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यामधील सिडको व नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याच्या समस्येबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाचे लक्ष वेधून सिडकोने घनकचरा व्यवस्थापन करावे, अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिडकोमार्फत नैना अधिसूचित क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत तात्काळ कार्यवाही करून त्यासंबंधी प्रस्ताव तयार करण्याचे आणि तो प्रस्ताव तात्काळ मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तालुक्यातील ४६ गावांचा घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लागणार असून यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी आला आहे.

ग्रामीण भागातील घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी मागणी करून या विषयावर शासनाचे लक्ष केंद्रित केले होते. पनवेल तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती सिडको व नैना अधिसूचित क्षेत्रात येतात. या भागात निवासी, औद्योगिक व वाणिज्यक विकास मोठ्या प्रमाणावर वाढल्याने लोकसंख्या आणि स्थलांतर वाढले आहे. परिणामी कचरा निर्मितीही प्रचंड प्रमाणात होत आहे. नैना अधिसूचित क्षेत्रात एकूण ४६ गावांचा समावेश असून, या सर्व ग्रामपंचायतींच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर घनकचरा निर्माण होत आहे. सध्या ग्रामपंचायती कचरा संकलन करतात. मात्र आर्थिक, तांत्रिक साधनसामग्री व मनुष्यबळाच्या अभावामुळे शास्त्रीय पद्धतीने कचरा प्रक्रिया करणे शक्य होत नाही. कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व चालवणे ग्रामपंचायतींसाठी खर्चिक आहे. म्हणून सिडको-नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामीण भागात निर्माण होणारा



कचरा सिडकोच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामार्फत प्रक्रिया करणे आवश्यक आहे. प्रक्रिया व वाहतूक खर्च ग्रामपंचायतींना परवडणारा नसल्याने सिडकोने ग्रामपंचायतींसोबत करार करून प्रक्रिया खर्च माफ केल्यास आणि कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारल्यास ग्रामीण भागात आदर्श घनकचरा व्यवस्थापन शक्य होईल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोला सूचित केले होते. त्या अनुषंगाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर सिडकोकडून संबंधित ग्रामपंचायतींना प्रत्येक गावाची लोकसंख्या, दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाण तसेच सद्यस्थितीत त्या कचऱ्याचे व्यवस्थापन कशा पद्धतीने केले जाते, याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या विषयावर सविस्तर चर्चा व पुढील कार्यवाहीसाठी मंगळवार दिनांक ३० डिसेंबरला दुपारी ०२ वाजता बेलापूर सिडको भवन येथे बैठक होणार असून एकात्मिक व शास्त्रीय पद्धतीने कचरा व्यवस्थापन होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### ३१ डिसेंबर व नवीन वर्ष आगमन निमित्ताने....

## पनवेल तालुका पोलीसांच्या मार्फत हद्दीतील फार्म हाऊस रिसॉर्ट चालक मालक यांना महत्वाच्या सूचना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

३१ डिसेंबर व नवीन वर्ष आगमन निमित्ताने पनवेल तालुका पोलीसांच्या मार्फत हद्दीतील फार्म हाऊस रिसॉर्ट चालक मालक यांना महत्वाच्या सूचना अनुषंगाने बैठक घेऊन देण्यात आल्या.



पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हद्दीतील फार्म हाऊस रिसॉर्ट चालक मालक यांची ३१ डिसेंबर व नवीन वर्ष आगमन निमित्ताने कार्यक्रमाचे अनुषंगाने बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी सूचना करताना सांगितले की, सीसीटीव्ही कॅमेरे अद्यावत करणे, अमली पदार्थ वापर होणार नाही याची दक्षता घेणे, स्पीकर परवानगी घेणे व विहित वेळेत स्पीकर बंद करणे, फार्म हाऊस रिसॉर्ट येथे क्षमता असेल तेवढीच बुकिंग करणे, अग्निशमन किट/फायर वाटला ठेवणे, फार्म हाऊस रिसॉर्ट येथे काम करणारे कामगारांचे व्हेरिफिकेशन करून घेणे, सेक्युरिटी गार्ड नेमणे, स्विमिंग पूल असल्यास तेथे प्रशिक्षित व्यक्तींची नेमणूक करणे, वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही त्याकरिता पार्किंग व्यवस्था करणे. आदी संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी सदर बैठकीस ३० फार्म हाऊस रिसॉर्ट चालक-मालक हजर होते.

## महामार्गावर डिझेल चोरी; दोघांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महामार्गाच्या कडेला थांबलेल्या वाहनचालकांना चाकूचा धाक दाखवून जबरीने डिझेल चोरी करणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारांना कळंबोली पोलिसांनी अटक केली आहे.

आकाश चव्हाण (२९, रा. फेज वन, तळोजा, नवी मुंबई) आणि जितू अनिल चावला (३६, रा. नवी मुंबई) अशी या दोघांची नावे आहेत. त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा गुन्हा केला होता. याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

त्यानुसार तपास पथकाने मोठ्या कुशलतेने तपास करत आकाश व जितू या दोघांना ताब्यात घेत त्यांच्याकडून १७५ लिटर डिझेल, ५ लाख रुपये किमतीची कार, एक चाकू, कारसाठी वापरत असलेली बनावट नंबर प्लेट व डिझेल चोरीसाठी वापरले जाणारे साहित्य पोलिसांनी जप्त केले. हे चोरटे ऑनलाइन ॲपद्वारे वाहन भाडेतत्त्वावर घेऊन त्यावर बोगस नंबर प्लेट वापरून डिझेल चोरीचे गुन्हे करत असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

तसेच त्यांनी यापूर्वी पनवेल तालुका, कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत व नवी मुंबई परिसरात असे गुन्हे केल्याचे समोर आले आहे.

# त्रिशंकूंची त्रेधातिरपीट!

डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाले आणि सगळ्यांचेच जगणे त्यांनी अवघड करून टाकले. 'अमेरिका फर्स्ट' असे म्हणताना त्यांना अमेरिकेशिवाय अन्य कोणाचाही विचार करायचा नाही, असे ठरवून टाकले. ट्रम्प यांच्या बेमुर्वतखोर आणि संकुचित भूमिकेमुळे जगाला धोक्याच्या वळणावर उभे केले आहे. कधी ते टेरिफ वाढवतात, तर कधी व्हिसावर निर्बंध लाद-तात. व्हिसासंदर्भात नवीन नियम आणतात. शुल्क वाढवतात. आता नवीच चिंता उभी ठाकली आहे. अमेरिकेतील कामाच्या परवान्यांचे नूतनीकरण करण्यासाठी भारतात आलेले शेकडो भारतीय एचवन-बी व्हिसाधारक आज अक्षरशः लटकले आहेत! अमेरिकेच्या वाणिज्यदूत कार्यालयांनी अचानक व्हिसा मुलाखती रद्द केल्या. काही पुढे ढकलल्या. काहींची स्वप्ने बेचिराख झाली. कैकजण शब्दशः 'त्रिशंकू' झाले आहेत. एचवन-बी व्हिसा हा काही फक्त कागदाचा तुकडा नाही. तो आयुष्याचा आराखडा असतो. नोकरी, घर, कर्ज, मुलांचे भविष्य हे सगळे त्या एका स्टॅम्पवर अवलंबून असते. तो स्टॅम्प उशिरा मिळाला, की आयुष्याचा संपूर्ण ताळेबंदच कोलमडतो. आज जे शेकडो लोक भारतात अडकले आहेत, त्यांची अडचण वैयक्तिक नाही; ती संस्थात्मक आहे. या सगळ्या प्रक्रियेत एक गोष्ट ठळकपणे दिसते आहे. व्यवस्था महत्त्वाची आहे, पण माणूस कुठे आहे? कोणत्याही व्यवस्थेचा केंद्रबिंदू माणूस असायला हवा. इथे मात्र 'सिस्टिम'च्या नावाखाली माणूस चिरडला जातो आहे. या व्हिसाधारकांपैकी अनेकांनी अमेरिकेत घरं घेतली आहेत. कर्जे घेतली आहेत. मुलं शाळेत घातली आहेत. नोकऱ्यांवर अवलंबून जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत, पण भारतात पाऊल ठेवताच त्यांचं आयुष्य पासपोर्टच्या कव्हरमध्ये बंद झालं आहे. 'थोडा उशीर होईल', असं सांगितलं जातं; पण या 'थोड्या'चा कालावधी कोणालाच माहीत नाही. अनिश्चिततेचा हा काळ केवळ प्रशासकीय नाही. तो मानसिक, आर्थिक आणि कौटुंबिक आहे. या पार्श्वभूमीवर आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना अमेरिकेबाहेर प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे. हा सल्ला म्हणजे अप्रत्यक्ष कबुली आहे. व्यवस्थेवर कंपन्यांचाही विश्वास उरलेला नाही. यांना कौशल्य हवे आहे, पण माणसाला स्थैर्य द्यायची तयारी नाही! एचवन-बी व्हिसा हा मुळात तात्पुरता कार्यक्रम. तीन वर्षांचा कालावधी, त्यानंतर आणखी तीन वर्षांची वाढ. अटी पूर्ण केल्यास पुढे मुदतवाढ. कागदोपत्री सगळे नीट आहे, पण वास्तवात हा 'तात्पुरता' शब्द अनेकांच्या आयुष्यभराचा होतो. वर्षानुवर्षे अमेरिका चालते त्यांच्या कौशल्यावर; पण त्यांना कायमचे स्वीकारण्याची तयारी मात्र नसते. काम स्वीकारले जाते; माणूस मात्र संशयाच्या भोवऱ्यात असतो. या कार्यक्रमाचा सर्वांत मोठा लाभार्थी भारत आहे. ७१ टक्के एच वन-बी व्हिसाधारक भारतीय आहेत. हे कौतुकाचे आहे आणि विचार करायला लावणारेही. कारण एकीकडे आपण जागतिक पातळीवर कुशल मनुष्यबळ पुरवतो, तर दुसरीकडे तेच मनुष्यबळ परदेशी व्यवस्थांच्या निर्णयांवर पूर्णपणे अवलंबून असते. आज अमेरिकेतील निर्णयांचा फटका भारतात बसतो आहे. अमेरिकेने आता एचवन-बी आणि एचफोर व्हिसा अर्जदारांसाठी व्यापक डिजिटल तपासणी लागू केली आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन उपस्थिती, डिजिटल वर्तन हे सगळे तपासले जाणार आहे. हेतू समजण्यासारखा आहे. पण प्रश्न असा आहे की, तपासणीच्या नावाखाली प्रक्रिया इतकी संथ, अस्पष्ट का? एवढी मनमानी का? 'जागतिक इशारा' देऊन सगळ्यांना संशयित ठरवणे हा कोणता न्याय? ज्या स्थलांतरितांनी अमेरिकेला घडवले, वाढवले, त्यांना असे छळणे हा कृतघ्नपणा आहेच, पण प्रश्न केवळ अमेरिकेचा नाही; भारताचाही आहे. आपल्या कुशल नागरिकांना परदेशात अडकून पडावे लागत असेल, तर भारतात त्यांच्यासाठी पर्याय का नाहीत? परत यायचे ठरवले तरी त्यांना योग्य संधी, पायाभूत सुविधा, सुरक्षितता हे सारे मिळते का? आपल्या देशात अधिक उज्ज्वल भविष्य आहे, असे आपल्याच माणसांना का वाटत नाही? 'अमेरिकन ड्रीम' त्यांना खुणावते, पण भारतात राहणे स्वप्नभंगाचे का वाटते? अमेरिकेने काय करायचे ते करावे. आपण मात्र आपले भविष्य अमेरिकेवर अवलंबून ठेवता कामा नये. आपल्याला अमेरिकेची गरज आहे, हे नाकारण्याचे कारण नाही. मात्र, तेवढीच अमेरिकेलाही आपली आवश्यकता आहे. आपण असे याचकाच्या भूमिकेत असता कामा नये. प्रसंगी अमेरिकेला ठणकावायला हवे. शिवाय, तसे पर्याय आपणही उभे करायला हवेत. नाही तर, माणसं अशीच त्रिशंकू होतील आणि व्यवस्था अधिकच अमानुष होत जाईल!

# लोकनेते अशोकदादा साबळे पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव शहरासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात सहकार क्षेत्रात विश्वासार्हतेचे प्रतीक म्हणून ओळ-खली जाणारी लोकनेते अशोक दादा साबळे पतसंस्था यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन अत्यंत उत्साहात व साधेपणाने पार पडले. सोमवार, दिनांक २२ डिसेंबर रोजी पतसंस्थेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात व्हाइस चेअरमन प्रशांत साबळे यांच्या शुभहस्ते दिनदर्शिकेचे अनावरण करण्यात आले.

या प्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन अरुण पवार, व्हाइस चेअरमन प्रशांत साबळे, सेक्रेटरी संजय ओसवाल, सल्लागार सुरेश जैन, ज्येष्ठ संचालक महादेव कनोजे, हेमंत शेठ, दिलीप कांबळे, व्यवस्थापक मनोज मुंडे, वसुली अधिकारी बाळासाहेब पवार, ज्येष्ठ लिपिक विजय जाधव, कॅशियर सुखदा धुमाळ, तसेच निलेश रातवडकर, बाबू कळमकर, सुमित पारखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते अशोक दादा साबळे पतसंस्थेने आपल्या कार्यकाळात सहकार क्षेत्रात आदर्शवत वाटचाल केली असून यंदा संस्थेच्या स्थापनेला २३ वर्षे पूर्ण झाली आहेत. विशेष म्हणजे स्थापनेपासून



आजपर्यंत सतत नफ्यात राहणारी रायगड जिल्ह्यातील एकमेव पतसंस्था म्हणून या संस्थेचा लौकिक आहे. सध्या संस्थेचे ४२ कोटी रुपयांचे भागभांडवल, सुमारे १० कोटी रुपयांच्या ठेवी असून वार्षिक उलाढाल ४१ कोटी रुपये इतकी आहे. या २३ वर्षांच्या यशस्वी प्रवासात संस्थेने हजारो बेरोजगार युवक-युवतींना स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी कर्जाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देत सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यामुळे ही पतसंस्था केवळ आर्थिक व्यवहारांची संस्था न राहता समाजाच्या सर्वांगीण विकासाची भागीदार ठरली आहे.

यावेळी बोलताना चेअरमन अरुण पवार यांनी सांगितले की, यंदाची दिनदर्शिका अत्यंत आकर्षक, सुबक व माहितीपूर्ण स्वरूपात तयार करण्यात आली असून ती सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, उद्योजक, नोकरदार, गृहीणी तसेच विद्यार्थी वर्गासाठीही उपयुक्त ठरेल. दिनदर्शिकेच्या प्रकाशनानिमित्त उपस्थित मान्यवरांनी पतसंस्थेच्या कार्याचा गौरव करत पुढील काळातही ही संस्था सहकार क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला.

# कार मिळवून देण्याच्या बहाण्याने सहा लाखांचा गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कारची बुकिंग न करता बुक केली असल्याचे सांगून तिची डिलिव्हरी लवकर देण्याकरिता सहा लाख नऊ हजार २९० रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी दिप्तेश लक्ष्मण गोरेविरोधात (रा. करंजाडे) पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

राजेंद्र निवृत्ती नाकाडे (रा. सेक्टर १२, खारघर) यांनी ऑक्टोबरमध्ये कार बुक केली. यासाठी २१ हजार रुपये दिले. नोव्हेंबरमध्ये गाडीची डिलिव्हरी लवकर देण्यासाठी एक लाख २९ हजार रुपये रोख दिले. नोकरी सोडून पसार त्यानंतर पुन्हा ५० हजार रुपये देण्यात आले.

आणखी पैसे पाठवले. गाडीची डिलिव्हरी लवकर देतो, असे सांगून ८ डिसेंबर आणि १२ डिसेंबर रोजी एक लाख ५८ हजार २९० रुपये ऑनलाइनद्वारे घेतले. पावत्या मागितल्यावर त्या ३ देण्यास टाळाटाळ करून फोन उचलणे बंद केले. त्यानंतर शोरूममध्ये फोन करून सदरचा प्रकार सांगितला. याबाबत मॅनेजरकडे चौकशी केली असता दिप्तेश याने घेतलेली रक्कम शोरूममध्ये जमा केलेली नसून तो पंधरा दिवसांपासून नोकरी सोडल्याचे समजले.

# पथनाट्याच्या माध्यमातून जिल्ह्यात एचआयव्ही/एड्स जनजागृती मोहीम



**दै.रायगड नगरी । रायगड**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, वडाळा, मुंबई येथील प्रकल्प संचालक तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात एचआयव्ही/एड्स जनजागृतीसाठी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील एकूण १५ ठिकाणी दोन कलापथकांच्या माध्यमातून दिनांक २४ ते २७ डिसेंबर २०२५ या कालावधीत एचआयव्ही/एड्स विषयक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. शाहीर पांडुरंग हनुमंत गवळी व सहकारी, सांगली यांच्या माध्यमातून पोलादपूर (शिवाजी चौक), महाड (बाज-ारपेठ), माणगांव (एस.टी. स्टॅन्ड), म्हसळा (प्राथमिक आरोग्य केंद्र), श्रीवर्धन (एस. टी. स्टॅन्ड), मुरुड-जंजिरा (समुद्रकिनारा) व रोहा (एस.टी. स्टॅन्ड) येथे पथनाट्ये सादर करण्यात येणार आहेत. तर शाहीर आलम रमजान पाटवेगार, सांगली यांच्या माध्यमातून अलिबाग (आंबेडकर चौक), पेण (एस.टी. स्टॅन्ड), खोपोली (शिळफाटा), पाली-सुधागड (प्राथमिक आरोग्य केंद्र), पनवेल (एस. टी. स्टॅन्ड), उरण (एस.टी. स्टॅन्ड), कशेळे (ग्रामीण रुग्णालय) व कर्जत (रेल्वे स्टेशन) येथे कार्यक्रम होणार आहेत.

आज दि. २४ डिसेंबर रोजी अलिबाग येथील आंबेडकर चौकात शाहीर आलम रमजान पाटवेगार यांच्या पथनाट्याद्वारे एचआयव्ही/एड्स म्हणजे काय, त्याची कारणे, लक्षणे, समज-गैरसमज, २०१७ चा कायदा, आयसीटीसी केंद्रे, टोल फ्री क्रमांक १०९७ तसेच छ-उज प याविषयी लोकगीतांच्या माध्यमातून प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

यावेळी एचआयव्ही संसर्ग होण्याचे चार प्रमुख मार्ग स्पष्ट करण्यात आले. त्यामध्ये असुरक्षित लैंगिक संबंध, एचआयव्ही संसर्गित व्यक्तीचीच सुई व सिरिंजचा वापर, संसर्गित रक्त देण्यात आल्यास तसेच एचआयव्ही बाधित पालकांकडून होणाऱ्या बाळाला संसर्ग होण्याची शक्यता यांचा समावेश आहे. प्रत्येक नागरिकांनी व विशेषतः गरोदर मातांनी शासकीय दवाखान्यातील आयसीटीसी समुपदेशन व तपासणी केंद्रातून एचआयव्हीची तपासणी करून घ्यावी, नेहमी नवीन सुईचा वापर करावा, रक्ताची गरज भासल्यास प्रमाणित रक्तपेढीतूनच रक्त घ्यावे तसेच एचआयव्ही संसर्ग आढळल्यास मोफत उपचार घ्यावेत, असे आ-वाहन करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने, आयसीटीसी समुपदेशक कल्पना गाडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अमित सोनवणे, महाराष्ट्र सामाजिक विकास संस्था, पेण येथील लिंक वर्कर श्रीमती करुणा म्हात्रे व श्रीमती मिनाली साळवकर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभागांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालयांतील समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ तसेच महाराष्ट्र सामाजिक विकास संस्था, पेण, लोकपरिषद संस्था, पनवेल, आधार ट्रस्ट, पनवेल, सक्षम संस्था, रोहा आणि परिवर्तन संस्था, पनवेल यांचे सहकार्य लाभत आहे.

# डंपिंगची विखारी आग विझता विझेना, धुराचा विळखा सुटता सुटेना

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगाव नगरपालिकेच्या डम्पिंग ग्राउंडलगत असलेली वनवासी कल्याण आश्रम शाळा सध्या आरोग्याच्या गंभीर संकटाला सामोरी जात आहे. या शाळेत शिक्षण घेणाऱ्या ३९७ विद्यार्थ्यांपैकी ५० हून अधिक विद्यार्थ्यांना न्युमोनिया, दमा, खोकला, सर्दी तसेच श्वसनासंबंधीच्या त्रासाने घेरले असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. इतकच काय येथील स्थानिक नागरिकांसह संपूर्ण शहराचे आरोग्य धोक्याचे उंबरठ्यावर उभे आहे.



विशेष गंभीर बाब म्हणजे तालुक्यातील मोर्बा, गोरेगाव, इंदापूर, लोणेरे, निजामपूर अनेक ग्रामपंचायतीमध्ये देखील कचऱ्याचे योग्य नियोजनाभावी दिवसेंदिवस कचरा जाळला जात असल्याने हीच समस्या गंभीर होत चालली असल्याचे लोक बोलतात. संबंधित शासनाकडून वेळीच लक्ष दिले गेले नाही तर हवेतील प्रदूषणामुळे सार्वजनिक आरोग्यच धोक्यात आले आहे.

शासनाच्या नियमानुसार शाळा, वसाहती आणि वसतिगृहांच्या आसपास डम्पिंग ग्राउंड उभारण्यास मनाई असताना, माणगाव नगरपंचायतीने येथे मोठ्या प्रमाणावर कचरा साठवून ठेवला आहे. या कचऱ्याची नियमित आणि शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट न लावल्यामुळे वारंवार आग लागते, प्लास्टिक जळाल्याने त्यातून निघणारा दाट काळा धूर थेट शाळा परिसरात पसरतो. धुराच्या सततच्या संपर्कामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लहान मुलांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप करत येथील शिक्षकांनी संबंधित प्रशासकीय यंत्रणेकडे तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

महत्वाची बाब म्हणजे हा मतदारसंघ महिला कॅबिनेट मंत्री आदिती तटकरे यांचा असून त्या महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्री आहेत. मात्र त्यांच्याच मतदारसंघात येणाऱ्या या आश्रम शाळेत शिकणाऱ्या ३९७ शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे देखील अशा प्रकारे शासनाचे दुर्लक्ष असल्याने नार-ाजीची भावना स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

दरम्यान, याबाबत माणगांव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे काम सुरू असून येत्या १५ ते २० दिवसांत डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल. सध्या डंपिंग मैदानात सुरू असलेल्या प्रक्रियेमुळेच संपूर्ण शहरात दुर्गंधी पसरत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# बोर्लीपंचतनचा ४० वा विद्यार्थी गुणगौरव व दिनदर्शिका प्रकाशन सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । कापोली**

गुणगौरव सोहळ्याचा मुख्य उद्देश म्हणजेच विद्यार्थ्यांच्या यशाचा, कठोर परिश्रमाचा आणि पालकांच्या पाठिंब्याचा गौरव केला जातो, जेणेकरून विद्यार्थी एवढ्या मोठ्या समारंभात सन्मानित झाल्यानंतर पुढे जबाबदारीने अभ्यास करुन स्वप्न साकार करण्यात मग्न होतात. अश्या कार्यक्रमात शिक्षकांना धन्यवाद देणे, भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा देणे आणि तंत्रज्ञान व नवीन संधींचा वापर करून प्रगती साधण्याचे आवाहन करणे हे महत्त्वाचे असते.आणि तोच सोहळा रविवार दिनांक: २१/१२/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता ब्राह्मण समाज मंडळ हॉल दादर पश्चिम येथे आगरी समाजबांधव, भगिनी व विद्यार्थी विद्यार्थिनींच्या तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात व आनंदात पार पडला.अखंड आगरी समाज विकास मंडळ मुंबईच्या वतीने दरवर्षी असे सामाजिक उपक्रम राबविले जातात



या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अखंड आगरी समाज बोर्ली पंचतनचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. ऋषिकांतजी गायकर, श्रीवर्धन तालुका माजी सभापती सुकुमारभाई तोंडलेकर, डॉ. सुभाष चौलकर, बबन नाक्ती (वडवली) सुर्यकांत धनावडे (दिवेआगर) ॲड. धनंजय चौलकर (अठरा गाव युवा अध्यक्ष), सुजित पयेर, आदी मान्यवरांसह मंडळाचे अध्यक्ष अश-ोक धुमाळ, उपाध्यक्ष महेंद्र धनावडे, खजिनदार हेमंत धनावडे, सल्लागार दत्तात्रेय धनावडे, संदिप पयेर, सुधाकर कांबळे महिला अध्यक्षा सुजाता गायकर, उपाध्यक्ष अर्चना धनावडे, खजिनदार विजया धुमाळ ह्या सर्वांना महिला मंडळानी औक्षण करून व्यासपीठावर स्थानापन्न होण्याची विनंती केली.

यावेळी आगरी समाजातील १३५ विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.तसेच जेष्ठ सभासदांना व्यासपीठ देवून त्यांचा गौरव करण्यात आला.

तेच औचित्य साधून दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन मोठ्या थाटामाटात करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात अनन्या निशीत गायकर हीच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवगर्जनेनी झाली तर ईशस्तवन सभासद विरेंद्र पयेर व सहकारी यांच्या गाण्याने झाली. विद्यार्थी मनोगतात निष्का धनावडे, व स्वरा पयेर यांनी मान्यवरांची व समाजबांधवांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे नियोजन, आयोजन पाहून मान्यवरांनी सुकुमारभाई तोंडलेकर यांनी मंडळावर, कार्यकारिणीवर स्तुत्य उपक्रमाबद्दल सुमने व्हायली. प्रत्येक कार्यक्रमाला सहकार्य करणारे आदेश धुमाळ,विराज गायकर, गजानन कांबळे, संदेश पाटील तसेच विभाग प्रमुख संदिप धनावडे, निशीत गायकर, गौतम मांदाडकर, संतोष धनावडे, अक्षय पयेर यांची मोलाची मेहनत सफल झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाचे सचिव श्री. नितीन गायकर, खजिनदार हेमंत धनावडे, महिला सचिव सौ. अनुराधा धनावडे, व उपसचिव मेघा पयेर यांनी केले.

# तळ्यात खासदार चषकाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । तळा**

प्रदीर्घ कालावधी नंतर पहिल्यांदाच तळा तालुक्यात क्रिकेटचा भव्य थरार रंगणार आहे तळा पंचायत समितीचे माजी सभापती रवींद्र गोविंद नटे यांच्या संकल्पनेतून खासदार चषक २०२५ भव्य मर्यादित क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.२६,२७,२८ डिसेंबर २०२५ रोजी आनंद वाडी येथे क्रिकेटचा थरार रंगणार असून महिला बालकल्याण मंत्री ना.अदिती तटकरे,माजी आ.अनिकेत तटकरे यांची प्रमुख उपस्थितीत या स्पर्धा पार पडणार आहेत. रायगडचे खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वाटप करण्यात येणार आहे

तळा पंचायत समितीचे माजी सभापती यांनी खासदार चषकाचे आयोजन करण्यात आले असून तळा तालुका क्रिकेट असोसिएशन आणि तळा क्रिकेट असो असोसिएशन यांचे त्यांना सहकार्य लाभणार आहे तळा पंचायत समितीचे माजी सभापती नटे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय झाल्यानंतरचा हा पहिलाच मोठा उपक्रम संपन्न होत आहे.रायगडचे खासदार सुनील तटकरे स्वतः क्रिकेट प्रेमी आहेत. खासदार चषक या नावामागे संकल्पना अशी आहे की दरवर्षी खासदारांच्या पुढाकाराने व उपस्थितीत ही क्रिकेट स्पर्धा तळा तालुक्यात खेळविली जाईल.या स्पर्धेच्या घोषणेनंतर आपले खासदार सुनील तटकरे, महिला बालकल्याण मंत्री ना.अदिती तटकरे,माजी आमदार अनिकेत तटकरे, इत्यादींनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या आहेत व स्पर्धे च्या उद्घाटन, पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित राहणार असल्याचे सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पश्चिम विभागीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड ३ रौप्य पदक


**दै.रायगड नगरी । पनवेल**

इंदूर मध्यप्रदेश येथे १९ते२१डिसेंबर २०२५ या कालावधीत पश्चिम भारत विभागीय क्लासिक राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियन स्पर्धा पार पडली. यामध्ये महाराष्ट्राच्या संघातून रायगडचे ३ खे-ळाडू सहभागी झाले होते.यामध्ये सब ज्युनिअर, ज्युनिअर आणि सिनिअर स्पर्धा झाली. यामध्ये ज्युनिअर मुली मध्ये ४३किलो वजनी गटात सार्वजनिक व्यायाम शाळा,वाढगांव (अलिबाग) सुहानी मंद संतोष गावडे हिने १६७.५किलो वजन स्कॉट, बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या प्रकारात उचलून २रा क्रमांक मिळवलाआणि रौप्य पदक जिंकले.तर ४७किलो वजनी गटात रायगडची आंतरराष्ट्रीय खेळाडू अमृता माधुरी ज्ञानेश्वर भगत,पॉवर हाऊस क्लब खोपोली हिने ३०५,किलो वजन स्कॉट बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट यामध्ये उचलून २रा क्रमांक मिळवला आणि रौप्य पदक जिंकले.तर मुलांच्या ८३ किलो वजनी गटात पेणच्या संसारे फिटनेस च्या अथर्व ज्योती मुकेश लोधी याने सुद्धा ६४२.५ किलो वजन स्कॉट बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या प्रकारात उचलून २रा क्रमांक मिळवलाआणि रौप्य पदक जिंकले.



या स्पर्धेत तिन्ही खेळाडू रौप्य पदकाचे पदकाचे मानकरी झाले. याबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोशियन रायगडचे अध्यक्ष गिरीश शरद वेदक, कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल, सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव, कार्यकारणी सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर,मानस कुंटे (अलिबाग), खजिनदार राहुल गजरमल ,सचिव अरुण पाटकर, उपाध्यक्ष सुभाष भाटे यांनी आनंद व्यक्त केला आहे आणि खेळाडूंच्या प्रशिक्षकांचेही अभिनंदन केले आहे.

# महेंद्रशेठ घरत यांचा कल्याण-गोवेली येथे कपिल पाटील यांनी केला सन्मान



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगर परिषदेची निवडणूक महाविकास आघाडीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची होती.त्या अनुषंगाने उरण नगरपालिका निवडणुकीच्या मतदानादिवशी सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले होते. महाविकास आघाडीला चांगले यश मिळू दे, असे गाऱ्हाणे गणरायाकडे त्यांनी त्यावेळी घातले होते. त्यानंतर त्यांनी उरणमध्ये मतदान केंद्रांना भेटी दिल्या होत्या. त्यामुळे महाविकास आघाडीच्या भावना घाणेकर या नगराध्यक्षपदी निवडून आल्याने आणि महाविकास आघाडीलाही चांगले यश मिळाल्याने महेंद्रशेठ घरत यांनी मुंबईतील सुप्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरात जाऊन गणेशाचे मंगळवारी (ता. २३) सकाळी दर्शन घेतले.

त्यानंतर ते कल्याण-गोवेली येथे धर्म जा-गरण सप्ताहाला उपस्थित राहून तेथे काल्याच्या कीर्तनात एक तास रमले. या सप्ताहाला हजारो भाविक उपस्थित होते. काल्याचे कीर्तन संपल्यानंतर केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी महेंद्रशेठ घरत यांचा सन्मान केला. त्यानंतर महेंद्रशेठ घरत यांनी टिटवाळा येथील गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी गणरायाचे प्रसन्न रूप पाहून ते काही क्षण निःशब्द झाले. दिनदुबळ्यांची सेवा करण्याची संधी मला लाभू दे, अशी प्रार्थना यावेळी त्यांनी मनोमन केली.

**दै.रायगड नगरी**
**बातम्या व जाहिरातींचे**
**उत्तम माध्यम**
**संपर्क :**
**९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११**

**वाचकांसाठी विनम्र सूचना**

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे : पनवेल, जि.रायगड येथील मिळकत क्र./ गट क्र./ सर्व्हे क्र.५६१/०, क्षेत्रफळ ३८७० चौ.मी.असून काही बनावट व तोतया लोकांनी षडयंत्र करून आमचे नावे असलेली मिळकत स्वतःचे नावे करून आमची व शासनाची फसवणूक केली आहे. या संदर्भात नवी मुंबई कमिशनर साहेब व पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करणेसंबंधी तक्रार केली आहे. या बनावटगिरीमध्ये शहाबाज बेलापूर येथील पाटील कुटुंब यांनी संगनमत करून ठाणे न्यायालय येथील मिळकतीसाठी मर्यादित वारस दाखला पनवेल येथील मिळकत ५६१/० आमची हडप करणेसाठी त्या वारसदाखल्याचा वापर केला आहे. तरी सदरची जागा कोणीही कोणत्याही प्रकारे खरेदी-विक्री करू नये अथवा विकसन करार करू नये. सदर जमिनीचा वाद न्यायालयात प्रलंबित आहे. जर कोणीही सदर जागेचा व्यवहार अथवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार केला तर मी / आम्ही त्या व्यवहारास जबाबदार राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी अथवा सावध रहावे, यासाठी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

दि.२२/१२/२०२५

**सही/-**
**रंजन गजानन पाटील**
**शेतकरी**

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे. देवम इंफ्रास्ट्रक्चर तर्फे भागिदार श्री. परेशकुमार नरसिंह सरैया व इतर पत्ता: शॉप नं. १, घर नं. ३७४, यतीन सदाशिव तांडेल, करावे सिमेंट, ॲक्सीस बँक एटीएम जवळ, सेक्टर ३६, करावे गांव, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६, यांनी मुळ मालक श्री. बिपीन त्रिलोकचंद कोठारी राहणार : एफ-१०६, मरीना, बी-वींग, कल्पतरु वॉटरफ्रंट, पनवेल, जि. रायगड ४१० २०६ यांच्या मालकीची मौजे गावठाण, ता. उरण, जि. रायगड येथील मिळकत २२.५ टक्के योजनेअंतर्गत संपादित केलेली असुन सदरहू संपादनापोटी मुळ मालक यांना सिडको २२.५ टक्के योजनेअंतर्गत खालील वर्णनाचा भूखंड मिळालेला असून सदरहू भुखंड आमचे अशिल यांनी सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरित करुन घेणार आहेत. सदरहू भुखंडाचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

नोड पुष्पक, ता. पनवेल, जि. रायगड
सिडको संचिका क्र. २५६/LP/पुष्पक

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक | २८ | ६५ | ४१० चौ.मी. |

तरी वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी वांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात आम्हांला आमचे खालील पत्यावर समक्ष येऊन भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी नमदु केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निषेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्या नंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दि.२४/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, सेक्टर १ए, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई - ४००६१४**

## जाहीर नोटीस

उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात
On Admission आरटीएस अपिल क्र. ४६१/२०२५

१. श्री. वासुदेव गणा फुलोरे,
रा. मु. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
२. श्री. इंदिरा बाळाराम पाटील
रा. मु. वलप, ता. पनवेल, नि. रायगड ४१०२०६ — वादी
विरुध्द
कै. विठाबाई मधुकर उर्फ महादु आदईकर मयत तर्फे वारस
श्री. जोमा मधुकर उर्फ महादू आदईकर
रा. कुत्तरपाडा, पो. वावंजे,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ — प्रतिवाादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड येथिल फेरफार नोंद क्र. २८८३ दि. ०१/१२/२०१२ चे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे, सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक ०५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यकत्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- वावंजे, ता. पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३५ | २ | ०.७४.७० | १०.६४ |
| ३६ | ० | ०.०६.३० | १.४४ |
| ५८ | ४ | ०.३२.१० | ४.१९ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- १९/१२/२०२५

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**

## अपर तहसिलदार कार्यालय पनवेल

**दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाटयगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड पिनः ४१०२०६**
Email: uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/ जन्म/७५१९३७६/२०२५
दि.२४/१२/२०२५

### नोटीस

विषय :- उशिरा जन्म नोंद करणेबाबत.
संदर्भ :- अर्जदार श्री. कुमार कृष्णा कडू यांचा दि. ०६/११/२०२५ रोजीचा अर्ज

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. कुमार कृष्णा कडू, रा.मु. कुत्तरपाडा, पो. देविचापाडा, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांचा स्वतःचा उशिरा जन्माचा नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक २३/०१/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(जितेंद्र मा. इंगळे-पाटील)**
**अपर तहसीलदार पनवेल**

## जाहीर नोटीस

याद्वारे नोटीस दिली जात आहे कि, माझे पक्षकार श्री. गणेश वसंत कदम यांच्या नावे असलेली सदनिका क्र-०४, तळ मजला, मातोश्री को-ऑप.हौ .सो .लि ,प्लॉट नं-२३,सेक्टर-१३,कळंबोली ,नवी मुंबई, ता - पनवेल, जि -रायगड, क्षेत्रफ़ळ-२८.०० चौ .मी . बि ल्टअप हि मालमत्ता आहे. श्री. गणेश वसंत कदम यांनी श्री. साहेबराव सोपान गव्हाणे सौ. संतोषी साहेबराव गव्हाणे यांना सदरचा रूम विकलेला असून त्यांना सदरील मालमत्ता सिडको ट्रान्सफर व पुढील नोंदणीकृत करायचे असून तरी या मालमत्तेबाबत कोणाला हरकत असेल तर १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर चौकशी करावी व हरकत असल्यास खालील पत्त्यावर हरकत पत्र घ्यावे. कार्यलयाचा पत्ता:- ऑफिस नं.९, स्मिथ अपार्टमेंट, सेक्टर-४,कळंबोली-४१०२१८ हि नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत जर कोणाची हि या मालमत्तेवर आक्षेप किंवा हरकत नाही असे ग्राह्य करण्यात येईल व कोणाला हरकत नाही असे समजण्यात येईल आणि सदरील मालमत्ता सिडको ट्रान्सफर व पुढील नोंदणीकृत केला जाईल याची नोंद घ्यावी व पुढील व्यवहार पूर्ण करण्यात येईल.त्यानंतर कोणाचीही तक्रार किंवा बळजबरी ग्राह्य धरल्या जाणार नाही.

दि.२४/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.भूषण लालासाहेब ढेकळे**
**मुंबई हायकोर्ट**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| चंद्रकांत सखाराम गोंधळी | २५/१ | ०-६७-७० पो.ख. ०-१३-७० एकूण क्षेत्र ०-८१-४० | १३.१९ |
| पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे नांवे असलेले क्षेत्र | | ०-३३-८० पो.ख. ०-०६-९० एकूण क्षेत्र ०-४०-७० | ६.५९ |
| यापैकी विक्री क्षेत्र | | ०-२०-०० | |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्य व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**१८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : मोर्बे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - मोर्बे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| संगम रामदास उलवेकर सागर रामदास उलवेकर | ३६/२ | ०-९५-०० पो.ख. ०-३३-०० एकूण क्षेत्र १-२८-०० | ९.१२ |
| पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे नांवे असलेले क्षेत्र | | ०-६२-०० पो.ख. ०-३३-०० एकूण क्षेत्र ०-९५-०० | ६.०२ |
| यापैकी विक्री क्षेत्र भातशेती | | ०-१६-०० | |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्य व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तकारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**१८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

## जाहीर नोटीस

उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात
आरटीएस अपिल क्र. ४६१/२०२५

श्रीमती. निर्मला बामा पोपेटा,
रा. मू. सुकापूर, पो. नविन पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड — वादी
विरुद्ध
१. श्री. अशोक कुमार, २. सुमित्रा कुमारी
दोघेही रा. बी-५०१, भगवती फेज-३.
से. २३. खारघर, ता. पनवेल, जि.रायगड
३. श्रीम. सुनिता गंगाराम फुलोरे,
४. श्री. संजय गंगाराम फुलोरे
५. श्री. राजेश गंगाराम फुलोरे,
६. श्री. ऋषिकेश गंगाराम फुलोरे
७. श्रीम. सुवर्णा सुरेश पावणेकर
क्र. ३ ते ७ रा. मु. भोकरपाडा, पो. नेरे,
ता. पनवेल, जि. रायगड
८. सौ. सुस्मिता मंगेश घरत,
रा. मु. पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड
९. अविनाश अशोक कोंडे,
रा. खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड
१०. स्वप्नील रावसाहेब साळुंखे,
रा. खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि.रायगड
११. विष्णू बापू फुलोरे,
रा. मु. भोकरपाडा, पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे भोकरपाडा, ता. पनवेल, जि. रायगड येथिल अपर तहसिलदार पनवेल यांचेकडील तक्रार केस क्र. २०/२०२५ चे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक ०५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यकत्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- भोकरपाडा (चिपळे), ता. पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १५ | ५ | ०.१०.० | ०.१९ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- १२/१२/२०२५

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

Pawar Madam Court
Adv.Kalidas S. Pote

## JAHIR NOTICE

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE
SENIOR DIVISION, PANVEL AT PANVEL

Civil M.A. No.1582/2025
Exh No.7/D
N.D. 16/02/2026

1. SMT. MALINI KRISHNAN
Aged 48 years, Occupation - Service
2. Mr. MITHUL SRIDHAR
Aged-19 years, Occupation - Student
Both Residing at E-62, 4th West Street
Kamraj Nagar, Thiruvanmiyur, Chennai
Tamil Nadu — Applicants
V/s
Mr. SUSHYANTH SRIDHAR
Aged-24 years, Occupation - Service
Residing at E-62, 4th West Street
Kamraj Nagar, Thiruvanmiyur, Chennai
Tamil Nadu — Opponent

The Applicant No.1 is Wife, Applicant No.2 is Son and Opponent No.1 os Son of Deceased Late Sridhar Srinivasan who was died on 31/07/2025 at Mubarak Hospital, Kuwait due to illness. The schedule of the property of the deceased is mentioned as under:

**SCHEDULE OF THE PROPERTY**

i) Flat No.302, Avon Wing, Tharwani's Riviera, Plot No.37, Sector-35-1, Owe Kharghar, Navi Mumbai, Tal -Panvel, Dist-Raigad (herein after referred to as the "Said Property No.1").

ii) Flat No.2, Ground Floor, Building No.A-1, Bhakti Heim, Plot No.106-108, Survey No.30A+31+33+34, New CTS No.151, Talegaon Dabhade, Tal-Maval, Dist-Pune (herein after referred to as the "Said Property No.2").

Whereas, the above named applicant has filed present Misc. Application for granting Heirship Certificate before the Hon'ble Civil Judge (S.D.) Panvel.

Any person/s having any objection to the present application of the Applicant or claim in respect of the said property as legal heir/s of the deceased, or wants to record his/her/their claim, objection or complaint in respect of his/her/their rights, title and interest in the said property, shall approached to this Hon'ble Court within 30 days by making written application or objection from the date of publication hereof. If any Objection/claim or complaint is not received within or on completion of 30 days period to this Hon'ble Court in respect of the Claim of the said property and the Applicants proved his legal Heirship by providing evidence/s, in that even this Court shall declare/d the Applicants as legal heir and shall issue Heirship certificate to the Applicant.

Given under the hands & seal of the court this 24 Day of December, 2025.

**Sd/-**
**Jr.Clerk**
**Civil Judge (S.D.)**
**Panvel**

**Court Seal**

**Sd/-**
**Asst.Supted.**
**Civil Judge (S.D.)**
**Panvel**

### उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांचा मनमानी कारभार....

# तळा येथील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग राम भरोसे

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा पंचायत समिती येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय राम भरोसे असून उप अभियंता एकनाथ कोठेकर कनिष्ठ अभियंता नेहमीच वेळेत हजर नसल्याने ग्रामीण भागातील कामे खोळंबली आहेत जलजीवन योजनेची कामे अर्धवट अवस्थेत पडून असल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले असून सरकारचे करोडो रुपये वाया गेले आहेत. तालुक्यात सिंचन क्षेत्र कमी असल्याने उन्हाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागतो यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी यांनी जलजीवन योजना आणली या योजनेच्या माध्यमातून 'हर घर जल' हे उद्दिष्ट समोर ठेवून योजना कार्यान्वित करण्यात आली परंतु तालुक्यात पाणी पुरवठ्याची कामे अंदाज पत्रकानुसार पार पडलेली नाहीत कामे अर्धवट उरकण्यात आलेली आहेत. योजनांची तक्रार करून देखील त्यावर योग्य ती अंमलबजावणी केली जात नाही.

रायगड जिल्हा परिषद अंतर्गत तळा पंचायत समिती येथे ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय सुरू करण्यात आले आहे मात्र येथील कार्यालयात अधिकारी नेहमीच गैरहजर असतात येथील उप अभियंता एकनाथ कोठेकर यांच्याकडे तीन तालुक्यांचा कारभार आहे कोणत्या दिवशी कुठल्या तालुक्याचा कारभार बघायचा हेच त्यांना माहीत नाही पाणी पुरवठा विभागाचे मालक समजून ते आपले कार्य करत आहेत दोन कनिष्ठ अभियंता आहेत ते देखिल कार्यालयात वेळेत हजर नसतात. त्यामुळे ग्रामीण भागातील नळ योजना बाबतची कामे वेळेवर होत नाहीत.

पत्रकार संजय रिकामे यांनी दि.२४ डिसेंबर रोजी कार्यालयात अर्ज देण्यासाठी भेट दिली असता सकाळी १०.११ मिनिटांनी कार्यालयाचे वरिष्ठ सहाय्यक रमेश राठोड हे केवळ हजर होते उप अभियंता, कनिष्ठ अभियंता हजर नव्हते,उपअभियंता यांच्याकडे तीन तालुक्याची जबाबदारी असल्याने ते आठवड्यातील कोणत्या दिवशी तळा कार्यालयात उपस्थित राहणार याची देखील माहिती कार्यालयास नाही त्यामुळे हे कार्यालय रामभरोसे असून येथे मनमानी कारभार सुरू आहे. त्यामुळे कामानिमीत्त आलेले ग्रामस्थ हताश होउन परत जात आहेत.

सामान्य जनतेची कामे होणार कशी? असा प्रश्न तळेवासीयांना पडला असुन आपल्या कामात कसुर करुन बेजवाबदारपणे वागणारया अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी जनतेकडुन केली जात आहे.तळा येथील ग्रामीण पाणी पुरवठा विभागात अधिकारी आणि कर्मचारी यांचा मनमानी कारभार सुरु असुन त्यांच्यावर कुणाचाही वचक राहीलेला नसल्याचे वारंवार दिसुन येत आहे.अभियंता पाहणी दौऱ्या निमित्त कामाच्या ठिकाणी भेट देत असतात परंतु कामे मात्र रखडलेली आहेत सामान्य जनता पाण्यापासून वंचित असताना या व्यथा लोकप्रतिनिधी सोडणार का? हा खरा प्रश्न आहे.

### पनवेल सार्वत्रिक निवडणूक २०२५...

# दुसऱ्या दिवशी १९४ नामनिर्देशन पत्राची विक्री

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पनवेल सार्वत्रिक निवडणूक बुधवार, १५ जानेवारी २०२६ रोजी होत आहे, तर मतमोजणी व निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होणार आहे. निवडणूक प्रक्रियेचा पहिला महत्त्वाचा टप्पा असलेल्या नामनिर्देशन प्रक्रियेला मंगळवार, २३ डिसेंबरपासून सुरुवात झाली आहे.

नामनिर्देशन पत्र विक्रीच्या पहिल्या दिवशी एकुण २३३ नामनिर्देशन पत्राची विक्री झाली होती. तर आज दिनांक २४ डिसेंबर नामनिर्देशन पत्र विक्रीच्या दुसऱ्या दिवशी एकुण १९४ नामनिर्देशन पत्राची विक्री झाली आहे.

नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी २३ डिसेंबर ते ३० डिसेंबरदरम्यान सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. दरम्यान आज बुधवार दिनांक २४ डिसेंबर दुसऱ्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय १, प्रभाग १,२आणि ३ रोजी एकूण ५५ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०२ , प्रभाग ४,५,६ येथे एकूण २३ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०३ , प्रभाग ७,८,९,१० येथे एकूण ३७ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी अधिकारी कार्यालय ०४ कामोठे , प्रभाग ११,१२,१३ येथे एकूण ४५ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०५, प्रभाग १४,१५,१६ येथे एकूण १८ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०६, प्रभाग १७,१८,१९,२० येथे एकूण १६ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. एकूणच आज सहा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून १९४ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. तर नामनिर्देशन पत्र प्राप्त संख्या शून्य आहे.

नामनिर्देशन पत्रांची छाननी बुधवार, ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू होणार आहे. वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी छाननीनंतर तत्काळ प्रसिद्ध केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक शुक्रवार, २ जानेवारी असून, सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. तर, शनिवार, ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार असून, त्याचदिवशी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे.

# २० महिन्यात ६ हजार ४४३ कुत्र्यांचा नागरिकांना चावा ; बंदोबस्त करण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । उरण**

मागील २० महिन्यांत उरण परिसरात ६ हजार ४४३ नागरिकांना कुत्र्यांनी 'प्रसाद' दिला आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत ३ हजार कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्या.त्यात काही नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले होते. या आकडेवारीवरून कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनांमध्ये सध्या वाढ झाल्याचे दिसून येत आहे.एकंदरीत महिन्याकाठी सरासरी ३०० श्वान दंशाच्या रुग्णांवर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

त्यामुळे भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वाता- वरण पसरले आहे.तरी उरण शहरातील व ग्रामीण भागातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी संबंधित प्रशासनाने पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

उरण शहर व परिसरातील ग्रामपंचायत हद्दीतील गावात दिवसेनदिवस कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.त्यातच परिसरात चिकन, मासळी,मटणाची दुकानेही झपाट्याने वाढत असल्याने सदरची कुत्री ही त्याठिकाणी टाकावू पदार्थ खाण्यासाठी तुटून पडतात.त्यात काही कुत्री ही नागरिकांवर हल्ला करुन चावा घेत आहेत.तसेच मोटारसायकल स्वार यांच्या मागून धावत जाऊन त्यांच्या वर हल्ला केल्याची घटना समोर येत आहे.त्यामुळे श्वान दंशाच्या घटनेत वाढ होत आहे.उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात २०२४ ते २०२५ या वर्षातील २० महिन्यांतच परिसरातील ६ हजार ४४३ श्वान दंशाच्या रुग्णांवर उपचार करण्यात आल्याची माहिती ग्रामीण रुग्णालयातून देण्यात येत आहे.

तसेच कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्र व खाजगी रुग्णालयातील श्वान दंशाच्या रुग्णांचा यात समावेश नाही.तसेच कुत्रा चावल्यानंतर काही नागरिकांना योग्य वेळी उपचार न मिळाल्याने श्वान दंशाच्या रुग्ण दगावले असल्याची माहिती ही समोर येत आहे.तरी उरण तालुक्यातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी संबंधित प्रशासनाने पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पनवेल वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेएनपीटी रोडवरील मानघर ब्रिजच्या वर पिकअप आणि डंपरमध्ये भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीचा खोळंबा झाला होता, मात्र पोलीस प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला असून वाहतूक पुन्हा एकदा पूर्ववत करण्यात आली आहे.

सदर अपघात घडल्यानंतर पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये पोलीस हवालदार ज्ञानेश्वर पवार, पोलीस हवालदार यादव, पोलीस हवालदार पवार, पोलीस नाईक केशव निकम आणि एमएसएफच्या जवानांनी अत्यंत कौशल्याने परिस्थिती हाताळली. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या मध्यभागी असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला होता, त्यामुळे क्रेन पाचारण करण्यात आली. क्रेनच्या साहाय्याने ही अपघातग्रस्त वाहने बाजूला करून पोलिसांनी रस्त्यावरील अडथळा दूर केला आणि विस्कळीत झालेली वाह- तूक तात्काळ सुरळीत केली.



# वारक आदिवासी वाडी मतदानावर बहिष्कार टाकणार बातमी झळकताच खा.सुनील तटकरेंनी घेतली दखल

**दै.रायगड नगरी । वावेदिवाळी इंदापूर**

वारक आदिवासी वाडी ही गेल्या २० वर्षा पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी एक निष्ठ राहून काम करत असताना या आदिवासी वाडीचाला आज तगायत विकास कामा पासून वंचित ठेवण्यात आली होती. दळणवळणासाठी रस्ता व पीण्याचे पाणी या आदिवासी वाडीला मिळत नसल्याने भीषण समस्या या आदिवासी वाडीतील नागरिकांची झाली आहे.



तसेच यावेळी वारक आदिवासी ग्रामस्थानी मगळवार दि. २३ डिसेंबर रोजी पत्रकारांशी संवाद साधून आम्ही येणाऱ्या जि.प.व प.स.निवडणुकीवर बहिष्कार टाकू तसेच मतदान करणार नाही रानात जाऊन बसू अशा प्रकारे बातमी दिली असता या बातमीची २४ तासांच्या आत त्वरित दखल ही महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष खा.सुनिल तटकरे साहेब यांनी घेऊन बुधवार दि.२४ डिसेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता आपल्या इंदापूर विभागातील कार्यकर्त्यांना वारक आदिवासी वाडीच्या नागरिकांच्या भेटीला पाठवून यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड द.जिल्हा कार्यध्यक्ष सुभाषशेठ केकाणे तसेच मणगांव ता.अध्यक्ष काका नवगणे,महाराष्ट्र युवक सचिव व भूवन ग्रामपंचायत सरपंच दिपकशेठ जाधव, माणगांव तालुका महिला अध्यक्षा संगीताई बक्कम,उदय अधिकारी ,संदेश मालोरे,यांच्या शुभ हस्ते वारक आदिवासी वाडी रस्त्याचे श्रीफळ वाढवून शुभारंभ करण्यात आला.यावेळी वारक आदिवासी वाडीतील समाजसेवक रमेश कोळी तसेच आदिवासी नागरिक व महिला वर्ग हे मोठ्या संखेने उपस्थित होते.यावेळी त्यांनी बोलताना सांगितले की आम्ही गेल्या २० वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात एक निष्ठेने काम करत असून खा.सुनिलजी तटकरे साहेब यांचे आम्ही निष्ठावंत कार्यकर्ते आहोत. आमच्याकडे काही वर्षे दुर्लक्ष झाल्याने व विकास कामे रंखडल्याने आम्ही मंगळवार दि २३ डिसेंबर २०२५ रोजी बातम्या दिल्या होत्या तसेच या बातम्याचा काही विरोधकानी गैर फायदा घेऊ नये आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आहोत आणि आम्ही वारक आदिवाडी खा.सुनिलजी तटकरे साहेबां बरोबरच राहाणार असे त्यांनी ठामपणे शेवटी बोलता सांगितले.

# स्वामी समर्थ साधना केंद्रात, श्रीवर्धन नगर परिषदेवर निवडून आलेल्या शिवसेनेच्या नगरसेवकांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

डिसेंबर महिन्याच्या दोन तारखेला श्रीवर्धन नगर परिषद २०२५ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान झाले होते. या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर झाला.

निकालानंतर नगर परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस हा सगळ्यात मोठा पक्ष ठरला. त्यांचे १५ नगरसेवक निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाचे तीन उमेदवार निवडून आले. तर भाजपचे दोन उमेदवार निवडून आले. आणि सगळ्यात नाट्यमय निकाल हा नगराध्यक्ष पदाचा लागला शिवसेना उबाठा गटाचे एड. अतुल चौगुले हे विजयी झाले.

शिवसेनेच्या निवडून आलेल्या दोन नगरसेवकांचा सत्कार श्रीवर्धन वडघर पांगलोली येथील स्वामी समर्थ साधना केंद्रामध्ये सदर स्वामी समर्थ साधना केंद्राचे संस्थापक दीपक तथा काका जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. शिवसेनेचे दोन्ही माजी शहरप्रमुख संतोष तथा पिंट्या वेशवीकर व देवेंद्र भुसाणे हे



दोघेही नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत.

शिवसेनेच्या तरुण महिला उमेदवार सलोनी मोहित या काही कारणास्तव उपस्थित राहू शकल्या नाहीत. संतोष तथा पिंट्या वेशवीकर व देवेंद्र भुसाणे यांचा सत्कार श्री स्वामी समर्थ साधना केंद्रामध्ये दीपक तथा काका जोशी यांनी केला.

यावेळी उमरोठकर गुरुजी, एडवोकेट संजीव डेगवेकर व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# महायुतीचे वारे घोंगावले ; शिवराष्ट्र पॅनेलने निवडणूक गांभीर्याने घेतली नाही

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शिवसेना-भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यां कडून नगराध्यक्ष पदासाठी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या नावाची शिफारस वरिष्ठांकडे केल्याने थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी चौधरी यांच्या मागे मोठया प्रमाणावर जनसमुदाय असल्याने यावेळचे वारे हे महायुतीच्या बाजूने असल्यामुळे साहजिकच महायुतीला जवळपास पंधरा जागांवर नगराध्यक्ष पदासहित अधिक मताधिक्याने विजय संपादन करता आला आहे.त्यातच अस्थायिक मतांचा भरणा देखील मोठया प्रमाणावर असल्याने कधी नव्हे एवढा घोडेबाजार पहिल्यांदाच घडला आहे. राजकीय वरीष्ठ मंडळींची सुध्दा याठिकाणी प्रतिष्ठा पणाला लागली होती त्यामुळे मतदारांना दोन्ही बाजूंनी मोठया प्रमाणावर आर्थिक लाभ घेता आला आहे. प्रत्येक प्रभागात जेमतेम तीनशे ते चारशे मतांना अगदी सहजपणे काबूत करण्यात महायुतीच्या उमेदवारांना काहीही अडचण आली नाही. केवळ दामदुप्पट रक्कमपुढे बहुतांश मतदार हतबल झाल्याने त्यांनी जवळजवळ एकहाती मते महायुतीच्या पारड्यात टाकली.मतदारांना सुध्दा यावेळी नवीन चेहरा हवा असल्याने चंद्रकांत चौधरी यांनी मागील दोन वर्षापासून जनसेवेची कामे करून मतदारांचा विश्वास संपादन केला होता. गावातील एक दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.काही शासकीय अधिकारी वर्गाला सुध्दा अपेक्षित सत्ताधारी गट यानिमित्ताने मिळाला असल्याने त्यांचे सुध्दा चांगभलं या सत्तेच्या माध्यमातून होणारच आहे.

तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि युबीटी यांच्या शिवराष्ट्र मध्ये प्रमुख नेत्यांनी ही निवडणूक गांभीर्याने घेतली नाही. काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी केलेल्या सूचना तसेच ज्या ज्या प्रभागात धोका उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली होती त्या बाबींकडे कानाडोळा केल्याने महत्वपूर्ण प्रभागातील जुन्या दिग्गज उमेदवारांना अपयश आले.एकूण मतदान ३४६१ इतके झाले होते त्यातील १७३१ मते थेट नगराध्यक्ष पदासाठी अपेक्षित होती. परंतु शिवराष्ट्र पॅनेलचे उमेदवार अजय सावंत यांना केवळ ११८८ मतांवर समाधान मानावे लागले तर प्रतिस्पर्धी उमेदवार चंद्रकांत चौधरी यांना २२५७ मते मिळाली जवळपास १०६९ मतांनी विजय मिळवून चौधरी हे नगराध्यक्ष पदाचे दावेदार ठरले आहेत. पंधरा जागांवर विजय प्राप्त करून नगराध्यक्ष पद महायुती कडे गेल्याने आगामी काळात सत्ताधारी गट कशाप्रकारे गावाच्या विकासाची कामे मार्गी लावून ह्या पर्यटनस्थळाला नावारूपाला आणतील हे पाच वर्षांच्या कार्यकाळात जनतेला दिसणार आहे. कारण याच सत्ताधारी गटात हट्रिक करणारे स्वयंभू नगरसेवक शिवाजी शिंदे सारखे निस्वार्थी व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या जोडीला अभ्यासू आणि राजकीय प्रदीर्घ अनुभवी नेतृत्व माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांच्याकडे विकास कामांचे पूर्णपणे व्हिजन आहे.त्यामुळे निश्चितच मनोज खेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सत्ताधारी मंडळी खात्रीपूर्वक या गावाचा कायापालट करू शकतात असा विश्वास समस्त माथेरान करांना अभिप्रेत आहे.

